# मुंबई

- **सोमवार, ८ जून ते १४ जून २०२६**
- **वर्ष** : १४
- **अंक** : १२
- **पृष्ठ** : ४
- **किंमत** : २ रुपए
- **PRGI Regd. No:** MAHMAR/2013/50698

मराठी साप्ताहिक

# सातारा प्रतिनिधी

**संपादक : एकनाथ दगडू गाडे    कार्यकारी संपादक : निखिल गाडे**

www.satarapratinidhinews.com
च्या सर्व सोशल मीडिया लिंक, ताज्या घडामोडी आणि अपडेट्स पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा


## थोडक्यात

### रेकॉर्डवरील अट्टल गुन्हेगार गावठी पिस्तुलासह जेरबंद

**रणजित मस्के, प्रतिनिधी**

चंदनझिरा पोलिसांनी गावठी पिस्तूल बाळगून परिसरात दहशत निर्माण करण्याच्या तयारीत असलेल्या रेकॉर्डवरील अट्टल गुन्हेगाराला अटक केली आहे. या कारवाईत आरोपीकडून सुमारे 40 हजार रुपये किमतीचे गावठी पिस्तूल आणि एक जिवंत काडतूस जप्त करण्यात आले.

पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार चंदनझिरा परिसरातील इंद्रायणी चौकात एक व्यक्ती गावठी पिस्तूल घेऊन संशयास्पद हालचाली करत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिस निरीक्षक बाळासाहेब पवार यांच्या नेतृत्वाखाली पथकाने 2 जून



रोजी रात्री साडेआठच्या सुमारास सापळा रचून कारवाई केली. यावेळी सचिन कैलास गायकवाड (रा. चंदनझिरा, जालना) याला ताब्यात घेण्यात आले.

झडतीदरम्यान त्याच्याकडून सिल्व्हर रंगाचे गावठी पिस्तूल आणि एक जिवंत काडतूस जप्त करण्यात आले. पोलिस तपासात सचिन गायकवाड हा रेकॉर्डवरील अट्टल गुन्हेगार असल्याचे समोर आले. त्याच्याविरुद्ध यापूर्वी दरोडा, दरोड्याचा प्रयत्न, खुनाचा प्रयत्न, मारामारी आणि लूटमार यांसारखे गंभीर गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

या प्रकरणी जमादार राजेंद्र पवार यांच्या फिर्यादीवरून आरोपीविरुद्ध आर्म्स ॲक्टअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याला अटक करण्यात आली आहे. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक रवी देशमाने करीत आहेत.

ही कारवाई पोलिस अधीक्षक तंगवीर सिंह संधू, अपर पोलिस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलिस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक बाळासाहेब पवार आणि पोलिस हवालदार कृष्णा तंगे यांनी केली.

### मोनोरेलच्या संचालनाचा मार्ग मोकळा, सुरक्षा प्रमाणपत्र प्राप्त ; आचारसंहिता संपुष्टात आल्यानंतर मोनोरेल पुन्हा रुळावर

**मुंबई प्रतिनिधी**

चेंबूर ते जेकब सर्कल मोनोरेल मार्गिका पुन्हा सुरु होण्याचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. मेट्रो रेल सुरक्षा आयुक्तांकडून (सीएमआरएस) मोनोरेलला सुरक्षा प्रमाणपत्र प्राप्त झाले असून संचालनासाठीची अंतिम प्रक्रिया पूर्ण झाली आहे. त्यामुळे अनेक महिन्यांपासून बंद असलेली मोनोरेल सेवा लवकरच प्रवाशांच्या सेवेत दाखल होणार आहे.
मात्र राज्यात सध्या विधान परिषद निवडणुकीची आचारसंहिता लागू असल्याने मोनोरेल तातडीने सुरु करता येणार नाही. आचारसंहिता 25 जूननंतर संपुष्टात येणार असल्याने त्यानंतरच सेवा सुरु करण्याबाबत निर्णय घेतला जाणार आहे. त्यामुळे प्रवाशांना जूनअखेरपर्यंत किंवा जुलैच्या पहिल्या आठवड्यापर्यंत प्रतीक्षा करावी लागण्याची शक्यता आहे.
मुंबईतील तसेच देशातील एकमेव मोनोरेल प्रकल्प सुरुवातीपासूनच विविध कारणांनी चर्चेत राहिला आहे. अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने हा प्रकल्प तोट्यात असल्याची टीका होत असतानाच वारंवार घडलेल्या तांत्रिक बिघाडांमुळे आणि अपघातांमुळे प्रवाशांच्या सुरक्षिततेबाबत प्रश्न उपस्थित होत होते.



ऑगस्ट 2025 मध्ये या मार्गिकेवर एकाच दिवशी दोन गंभीर अपघात घडले होते. अतिवजनामुळे दोन मोनोरेल गाड्या कलंडल्या होत्या. एका गाडीतील प्रवाशांना काचा आणि दरवाजे तोडून बाहेर काढावे लागले होते. त्यानंतर काही दिवसांतच आणखी एक अपघात झाल्याने मोनोरेलच्या सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. या पार्श्वभूमीवर सप्टेंबर 2025 मध्ये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मोनोरेल सेवा अनिश्चित काळासाठी बंद करण्याचा निर्णय घेतला होता.
यानंतर संपूर्ण मार्गिका, तांत्रिक प्रणाली आणि गाड्यांचे अत्याधुनिकीकरण करण्यात आले.

## भेसळखोरांनो सावधान! अन्न-औषधातील भेसळीविरोधात तुकाराम मुंडेंची थेट हेल्पलाइन; टोल-फ्री क्रमांक आणि ई-मेल जारी

**मुंबई प्रतिनिधी**

राज्यात अन्न आणि औषधांमधील भेसळ, निकृष्ट दर्जाची उत्पादने तसेच प्रतिबंधित पदार्थांच्या विक्रीविरोधात अन्न व औषध प्रशासन विभागाने कडक भूमिका घेतली असून, नागरिकांना आता अशा गैरप्रकारांची थेट तक्रार करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांनी यासाठी विशेष टोल-फ्री क्रमांक आणि ई-मेल आयडी जारी करत नागरिकांना भेसळीविरोधातील मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.अन्न व औषध प्रशासन विभागाचा पदभार स्वीकारल्यानंतर अवघ्या काही दिवसांतच मुंडे यांनी राज्यभरात धडक कारवाया सुरू केल्या आहेत. विविध ठिकाणी टाकलेल्या छाप्यांमध्ये कोट्यवधी रुपयांचा संशयित आणि भेसळयुक्त माल जप्त करण्यात आला असून



अनेकांविरोधात गुन्हे दाखल करून अटकही करण्यात आली आहे. या कारवायांमुळे भेसळखोरांमध्ये खळबळ उडाली असून, आगामी काळात आणखी कठोर पावले उचलली जाणार असल्याचे संकेत प्रशासनाने दिले आहेत.
नागरिकांसाठी थेट तक्रार नोंदविण्याची सुविधा
अनेकदा परिसरात अन्नभेसळ किंवा निकृष्ट दर्जाच्या अन्नपदार्थांची विक्री होत असल्याची माहिती नागरिकांना असते. मात्र, तक्रार नेमकी कुठे आणि कशी करायची याबाबत पुरेशी माहिती नसल्याने अनेक प्रकरणे समोर येत नाहीत. ही बाब लक्षात घेऊन अन्न व औषध प्रशासनाने नागरिकांसाठी थेट संपर्काची सुविधा उपलब्ध करून दिली आहे.
यापुढे अन्नपदार्थ किंवा औषधांमध्ये भेसळ, बनावट उत्पादनांची विक्री, मुदतबाह्य वस्तूंचा वापर किंवा प्रतिबंधित घटकांचा वापर होत असल्याचा संशय असल्यास नागरिक थेट विभागाशी संपर्क साधू शकणार आहेत.

**तक्रारींसाठी संपर्क**
**टोल-फ्री क्रमांक** : 1800 222 365
**ई-मेल** : jc-foodhq@gov.in

प्रशासनाने नागरिकांना फोनद्वारे किंवा ई-मेलच्या माध्यमातून माहिती देण्याचे आवाहन केले आहे. संबंधित ठिकाणाचा पत्ता, संशयित उत्पादनाची माहिती आणि उपलब्ध पुरावे दिल्यास तातडीने कारवाई केली जाईल, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.
'शुद्ध आणि सुरक्षित अन्न हा नागरिकांचा मूलभूत अधिकार'
अन्न व औषध प्रशासनाने जारी केलेल्या परिपत्रकात नागरिकांच्या आरोग्याशी तडजोड करणाऱ्यांविरोधात कठोर भूमिका स्पष्ट करण्यात आली आहे

"नागरिकांना शुद्ध आणि सुरक्षित अन्न मिळणे हा त्यांचा मूलभूत अधिकार आहे. भेसळयुक्त, निकृष्ट दर्जाचे किंवा प्रतिबंधित पदार्थांचे उत्पादन आणि विक्री करणाऱ्यांविरोधात यापुढे आणखी कठोर कारवाई करण्यात येईल," असा इशारा आयुक्त तुकाराम मुंडे यांनी दिला आहे.

प्रशासनाने अन्नपदार्थांच्या गुणवत्तेबाबत शंका असल्यास नागरिकांनी त्वरित विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे. याशिवाय तक्रारींचे व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्यासाठी स्वतंत्र तक्रार नोंदणी अॅपही विकसित करण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे.

तक्रार करताना ही माहिती द्या
तक्रारीची दखल तातडीने घेता यावी यासाठी नागरिकांनी खालील माहिती नमूद करावी, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

**तक्रारदाराचे नाव**
**संपूर्ण पत्ता**
**संपर्क क्रमांक**
**संबंधित आस्थापनेचा अचूक पत्ता**
**कोणत्या अन्नपदार्थात किंवा औषधात भेसळ होत असल्याचा संशय आहे याची माहिती**
**उपलब्ध असल्यास छायाचित्रे किंवा इतर पुरावे**

भेसळविरोधातील मोहिमेला वेग
राज्यातील नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित प्रश्नांवर कठोर कारवाई करण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाने विशेष मोहीम हाती घेतली आहे. बाजारपेठांमध्ये, उत्पादन केंद्रांमध्ये तसेच साठवणूक गोदामांमध्ये तपासणी मोहीम अधिक तीव्र करण्यात आली असून, भेसळ करणाऱ्यांविरोधात फौजदारी कारवाईचा बडगा उगारला जात आहे.

## सर्पदंशावरील संशोधनासाठी भारत-घाना सहकार्याची नवी दिशा

**मुंबई प्रतिनिधी**

सर्पदंशावरील प्रभावी उपचारपद्धती विकसित करण्यासह जागतिक आरोग्य संशोधनाला बळ देण्यासाठी मुंबईतील हाफकिन प्रशिक्षण, संशोधन व चाचणी संस्था आणि घाना सरकारच्या सेंटर फॉर प्लांट मेडिसिन रिसर्च या दोन महत्त्वाच्या संस्थांनी एकत्र येण्याचा निर्णय घेतला आहे. परळ येथील हाफकिनच्या मुख्यालयात या दोन्ही संस्थांच्या उच्चस्तरीय शिष्टमंडळाची नुकतीच एक महत्त्वपूर्ण बैठक पार पडली असून यात वैज्ञानिक संशोधनाच्या विविध संधींवर सविस्तर चर्चा करण्यात आली.
आशिया आणि आफ्रिकेतील ग्रामीण भागात सर्पदंशाची समस्या गंभीर असून यावर स्वस्त व प्रभावी उपचार उपलब्ध करून देणे हे दोन्ही देशांपुढील मुख्य आव्हान आहे. या बैठकीत पारंपरिक वनस्पतीजन्य औषधांचे वैज्ञानिक प्रमाणीकरण करण्यावर विशेष भर देण्यात आला.
यासोबतच झेब्राफिशवर आधारित प्रीक्लिनिकल मॉडेल्स तयार करणे आणि विषशास्त्र क्षेत्रात संयुक्त संशोधन प्रकल्प राबविण्याबाबत दोन्ही संस्था सकारात्मक आहेत. जागतिक स्तरावरील संशोधन अनुदानासाठी संयुक्त प्रस्ताव सादर करणे आणि संशोधक व विद्यार्थ्यांची देवाणघेवाण करणे यांसारख्या मुद्द्यांवरही यावेळी प्राथमिक सहमती झाली.
हाफकिन संस्थेच्या संचालक डॉ. सुवर्णा खरात यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या बैठकीत घानाच्या शिष्टमंडळाने सहभागी होऊन दोन्ही देशांतील वैज्ञानिक संबंधांना नवी दिशा दिली आहे. या शिष्टमंडळात सीपीएमआरचे अध्यक्ष हेन्री रॉकफेलर निम्बाबोउरा, कार्यकारी संचालक प्रा. ॲलेक्स असासे यांच्यासह वरिष्ठ शास्त्रज्ञ व अधिकारी उपस्थित होते.
या सहकार्यामुळे युवा वैज्ञानिकांना जागतिक दर्जाच्या संशोधन पद्धतींचा अनुभव घेण्याची संधी मिळेल.

उर्वरित पान क्र. २ वर.



## प्रशासनाची मोठी कारवाई पाच जिल्ह्यांत १४ ठिकाणी छापे

**वैभव जाधव, प्रतिनिधी**

अन्न व औषध प्रशासनाने भेसळीच्या संशयावरून पुणे विभागात मोठी कारवाई करत पुण्यासह सातारा, सांगली, सोलापूर आणि कोल्हापूर जिल्ह्यांतील १४ ठिकाणी छापे टाकले. या कारवाईत सुमारे ३१ लाख ७३ हजार रुपयांचा प्रतिबंधित व संशयित अन्नसाठा जप्त करण्यात आला असून संबंधित आस्थापनांविरुद्ध पुढील कारवाई सुरू करण्यात आली आहे.
ग्राहकांच्या आरोग्याशी तडजोड करणाऱ्या आणि बेकायदेशीररीत्या प्रतिबंधित अन्नपदार्थांची साठवणूक व विक्री करणाऱ्यांवर अन्न व औषध प्रशासनाने ही मोहीम राबवली. कारवाईदरम्यान पानमसाला, गुटखा, दुग्धजन्य पदार्थ, सोयाबीन, कडधान्ये, मैदा, बेसन तसेच अन्य अन्नपदार्थांचा मोठा साठा जप्त करण्यात आला.
जुन्नर, आंबेगाव आणि खेड तालुक्यात स्वतंत्रपणे पाच ठिकाणी छापे टाकण्यात आले. या कारवाईत सुमारे १९ लाख रुपयांचा भेसळयुक्त व प्रतिबंधित माल जप्त करण्यात आला. आंबेगाव तालुक्यातील मंचर येथील एका गोदामावर छापा टाकून गुटखा व पानमसाल्याचा साठा जप्त करण्यात आला. त्याच परिसरातील आणखी एका दुकानातून भेसळयुक्त मैदा, बेसन आणि आटा असा दहा लाख रुपयांहून अधिक किमतीचा साठा जप्त करण्यात आला.

खेड तालुक्यातील खालची भांबुरवाडी येथे विनापरवाना सुरू असलेल्या सुपारी कारखान्यावर छापा टाकून सुमारे आठ लाख रुपयांची सुपारी जप्त करण्यात आली. नरे परिसरातील एका फरसाण दुकानात हिरव्या वाटाण्यामध्ये कृत्रिम रंगांचा वापर केल्याचे प्राथमिक तपासात आढळून आले. संबंधित अन्नपदार्थांचे नमुने प्रयोगशाळेतील तपासणीसाठी पाठविण्यात आले आहेत.

या मोहिमेत अन्नसुरक्षा अधिकाऱ्यांच्या विविध पथकांनी सहभाग घेतला. सहायक आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली ठिकठिकाणी तपासणी करून संशयित अन्नपदार्थांचे नमुने जप्त करण्यात आले. जप्त केलेल्या नमुन्यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर संबंधितांवर कायदेशीर कारवाई केली जाणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली.

ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या आणि अन्नसुरक्षा नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध अशा कारवाया पुढेही सुरू राहतील, असा इशारा अन्न व औषध प्रशासनाने दिला आहे. संशयास्पद अन्नपदार्थांची विक्री अथवा साठवणुकीची माहिती नागरिकांनी प्रशासनाच्या टोल फ्री क्रमांकावर देण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.




## २२ वर्षांपासून फरार असलेला आरोपी ओशिवरा पोलिसांच्या जाळ्यात; विलेपार्लेतून अटक

**स्वप्नील गाडे,प्रतिनिधी**

ओशिवरा पोलीस ठाण्यात 2004 मध्ये नोंद झालेल्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कायदा (पिटा अॅक्ट) अंतर्गत गंभीर गुन्ह्यातील २२ वर्षांपासून फरार असलेल्या आरोपीला पोलिसांनी अखेर अटक केली. राजेंद्र शिवराम शिंदे (वय 49) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

या प्रकरणात माझगाव सत्र न्यायालयाने आरोपीविरुद्ध स्थायी अजामीनपात्र अटक वॉरंट जारी केले होते. आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी विविध स्तरांवर तपास सुरू ठेवला होता. आरोपीच्या नोंद असलेल्या पत्त्यावर चौकशी केली असता संबंधित झोपडपट्टी परिसर 2012-13 मध्ये पुनर्विकासासाठी हटविण्यात आल्याची माहिती मिळाली. त्यामुळे आरोपीचा ठावठिकाणा लागत नव्हता. दरम्यान, गुप्त माहितीदारामार्फत आरोपीने 2005 मध्ये आपली खोली



विकून अन्यत्र स्थलांतर केल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर निगराणी पथकाने विविध माध्यमांतून माहिती गोळा करून आरोपी विलेपार्ले परिसरात वास्तव्यास असल्याची खात्रीशीर माहिती मिळवली. त्यानुसार गोपनीय पाळत ठेवण्यात आली. 3 जून 2026 रोजी संशयित व्यक्तीला ताब्यात घेऊन चौकशी केली असता तोच या गुन्ह्यातील फरार आरोपी राजेंद्र शिवराम शिंदे असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर त्याला अटक करण्यात आली.

अटक आरोपीला पुढील कार्यवाहीसाठी माझगाव न्यायालयात हजर करण्यात आले.

ही कारवाई पोलीस उपनिरीक्षक तुषार बाविस्कर, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक सुनील साळुंखे, पोलीस हवालदार महेश साळोखे आणि पोलीस शिपाई महेंद्र भोये यांनी केली.

## नालेसफाईवर आता रोबोटची नजर; कागदी कामांना बसणार लगाम

**रणजित मस्के, प्रतिनिधी**

दरवर्षी पावसाळ्यापूर्वी नालेसफाई आणि पावसाळी वाहिन्यांच्या स्वच्छतेवर महापालिकेकडून कोट्यवधी रुपये खर्च केले जातात. मात्र पहिल्याच पावसात शहरातील अनेक रस्त्यांवर पाणी साचत असल्याने या कामांच्या गुणवत्तेबाबत प्रश्न उपस्थित केले जातात. याच पार्श्वभूमीवर नालेसफाईची प्रत्यक्ष पडताळणी करण्यासाठी महापालिकेने आता रोबोटिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याचा निर्णय घेतला आहे.
शहरातील नाले आणि पावसाळी वाहिन्यांची सफाई प्रत्यक्षात झाली की केवळ कागदोपत्री कामे दाखवून बिले उचलली गेली याची तपासणी करण्यासाठी भुयारी वाहिन्यांमध्ये रोबोट उतरविण्यात येणार आहेत. १५ जूननंतर या विशेष मोहिमेला सुरुवात होणार असून कामात त्रुटी आढळल्यास संबंधित कंत्राटदार आणि अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाणार असल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त प्रजित नायर यांनी दिली.

मान्सूनपूर्व कामांचा आढावा घेताना नायर यांनी सर्व विभागांना कामे वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. नालेसफाईच्या कामांबाबत दरवर्षी तक्रारी होत असल्याने प्रत्यक्ष स्थिती तपासण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा आधार घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

महापालिका हद्दीत तब्बल ४९ हजार ६५६ स्टॉर्म वॉटर चेंबर्स आहेत. या सर्वांची साफसफाई करणे कंत्राटदारांना बंधनकारक आहे. यापैकी सुमारे १५०० ते २००० चेंबर्स आणि वाहिन्यांची अचानक तपासणी रोबोटच्या मदतीने केली जाणार आहे. त्यामुळे नालेसफाईच्या कामांचा प्रत्यक्ष पुरावा प्रशासनाकडे उपलब्ध होणार आहे.

महापालिकेने गेल्या आठवड्यात शहरातील १९ चेंबर्समध्ये रोबोटिक पाहणीचा प्रायोगिक प्रकल्प राबविला होता. या चाचणीचे समाधानकारक परिणाम मिळाल्यानंतर आता व्यापक स्तरावर या तंत्रज्ञानाचा वापर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. रोबोट चेंबरच्या आत जाऊन स्वच्छतेची स्थिती तपासतो आणि त्याचा तपशीलवार अहवाल प्रशासनाला उपलब्ध करून देतो.

दरम्यान नालेसफाईदरम्यान काढलेला गाळ रस्त्याच्या कडेला टाकून ठेवण्याच्या प्रकारांवरही महापालिकेने नाराजी व्यक्त केली आहे. पहिल्या पावसात हा गाळ पुन्हा वाहिन्यांमध्ये जाऊन अडथळे निर्माण होतात. अशा प्रकारांची माहिती नागरिकांनी छायाचित्रांसह महापालिकेला द्यावी. दोषी आढळणाऱ्या कंत्राटदारांवर तातडीने कारवाई करण्यात येईल, असा इशाराही प्रशासनाने दिला आहे.

